International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# क्रांतिसिंह नाना पाटील यांचे सामाजिक चळवळीतील नेतृत्व

**डॉ. राहुल दत्ता मांडणीकर[1], दत्तात्रय वसंत पाटील[2]**

[1]*मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर*

[2]*संशोधक विदयार्थ, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर*

*Corresponding Author – डॉ. राहुल दत्ता मांडणीकर*

**DOI - 10.5281/zenodo.18491400**

**प्रस्तावना :**

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे सामाजिक कार्य हे त्यांच्या राजकिय व क्रांतिकारी कार्या इतकेच महत्वाचे होते. ते केवळ स्वांतत्र्य सैनिक नव्हते तर एक समाजकारणी, शेतकरी व मजुरांचे हक्क सांगणारे, शिक्षणाचे प्रसारक, आणि गरिब, वंचित, शोषित, यांचे खरे पुरस्कर्ते होते. नाना पाटील यांनी तलाठ्याची नोकरी सोडून त्यांनी घरातील व्यापही मागे टाकले. आणि सार्वजनिक जीवनात प्रवेश करावयास तयार झाले. त्यापुर्वी त्यांच्यावर सत्यशोधक चळवळीचा प्रभाव पडला होता. ही चळवळ खेडोपाडी पुरोहितशाही, अंधश्रध्दा, साक्षरता, कर्जमुक्ती यासाठी शेतकऱ्यांच्यात मोठ्या प्रमाणात जागृती करण्याचा प्रयत्न करीत होती. नाना पाटील या चळवळीत सामील झाले होते. सामाजिक अन्याया विरुध्द संघर्ष करीत असताना त्यांच्या सार्वजनिक जीवनाची जडणघडण होत होती. सत्यशोधक समाज चळवळीत काम करीत असताना नाना पाटील यांना अन्याया विरुध्द लढण्याची प्रेरणा मिळाली होती. नाना पाटील यांनी सतत श्रमजीवी जनतेच्या संघर्षासाठी प्रयत्न केला. शेतकरी, शेतमजूर, कामगार, यांच्या न्याय मागण्यांचा पाठपुरावा केला. खंडकरी शेतकऱ्यांचे लढे नाना पाटील यांच्यामुळेच यशस्वी झाले. नाना पाटील स्वत: शेतकरी असल्यामुळे शेवटपर्यंत ते शेतकऱ्यांच्या मालाला भाव बांधून दिले पाहिजेत यासाठी लढले.

**उद्देश:**

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी समाजाला राजकिय आणि सामाजिक अन्यायाशी लढा देण्यास कशा प्रकारे तयार केले. याचा अभ्यास करणे हे या संशोधनाचे मुख्य उद्दीष्ट आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सामाजिक चळळवळीतील नेतृत्वाचा सखोली अभ्यास करणे. शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे विश्लेषण करणे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे ब्राम्हणेत्तर चळवळ, शेतकरी चळवळ, व समाजवादी विचारसरणीतील त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे. सामाजिक समता, स्वातंत्र्य व न्याय या मुल्यांसाठी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केलेल्या आंदोलनाचा अभ्यास करणे. समाजातील सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामान्य जनतेला कशा प्रकारे संघटित केले या त्यांच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास करणे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे विचार आजच्या सामाजिक चळवळीसाठी कशा प्रकारे उपयुक्त पडतात याचा अभ्यास करणे. ही संशोधनाची उद्दीष्टे आहेत.

**विषय स्पष्टीकरण :**

**सत्यशोधक समाजाची चळवळ :**

सत्यशोधक समाजाची चळवळ पश्चिम महाराष्ट्रात महात्मा फुले यांच्यानंतर शाहूमहाराजांच्या आश्रयाने वाढली. त्यामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रात बहुजन समाजातील माणसे हिरीरीने भाग घेऊ लागली. काम करु लागली. आणि चमकू लागली. त्यातूनच ब्राम्हणेत्तरांच्या न्याय हक्कासाठी लढणारी ब्राम्हणेत्तर चळवळ पुढे आली. नाना पाटील सहा वर्षे सत्यशोधक समाजाच्या चळवळीत वावरले. त्यांनी अन्याय, जुलूम, एकाधिरशाही, गुलामगीरी यांच्या विरुध्द आवाज उठविण्यास सुरुवात केली होती. त्यांनी या चळवळीत सक्रिय भाग घेतला. त्यामुळे संपूर्ण सातारा जिल्हयात सत्यशोधक चळवळ पसरली होती. सत्यशोधक समाजाची चळवळ म्हणजे महाराष्ट्रातील पहिली बहुजन समाजाची चळवळ होती. त्यांनी खालचा समाज इतका खोलवर ढवळला गेला की खालच्या समाजात वैचारिक शक्ती निर्माण केली गेली. त्यामुळे विचारांना वैचारिक चालना मिळाली. सत्यशोधक चळवळीने बहुजन समाजाला, समाजातील बहुसंख्य वर्गाला वैचारिक शक्ती दिली, प्रगतीची चालना दिली. आपल्याला कांहीतरी हक्क आहेत. आपल्यावर कोणीतरी आणि काहीतरी अन्याय करीत आहेत, कोणाच्या तरी पायतळी आपण तुडविले जात आहोत. त्या अन्यायाला आपण पायतळी तुडविले पाहिजे ही भावनेची ज्योत खालच्या असंख्य बहुजन समाजात सत्यशोधक समाजानेच पेटवली होती.

**क्रांतिसिंह नाना पाटील यांचा अंधश्रध्दा आणि भिक्षुकशाहीला विरोध :**

सत्यशोधक चळवळीत काम करीत असताना नाना पाटील यांनी भिक्षुकशाही आणि अंधश्रध्दा यावर जोरदार हल्ला केला. या पिळवणूकी विरुध्द त्यांनी बंड केले. भटांनी बहुजन समाजावर लादलेली धार्मिक व मानसिक गुलामगिरी फेकून दया असा प्रचार नानानी सतत केला. सत्यशोधक चळवळीत अभिप्रेत असणारी समाजसुधारणा हयातभर करीत राहिले.

आतापर्यंत अनेक समाजसुधारकांनी समाजातील अंधश्रध्दा, भोळसटपणा, देवाच्या नावाखाली भोंदूगिरी, अनिष्ट चालीरिती यावर हल्ले चढविले आहेत. पण नाना पाटील आपल्या प्रचंड सभांतून अंधश्रेध्देवर आसूड उठवायचे. त्यांच्या सभेला शेतकरी, शेतमजूर, श्रमिक व कामगार हजर असत. क्रांतिसिंह नाना पाटील शेतकऱ्यांच्या भाषेतच दैनंदिन जीवनातील दाखले देत विनोद करीत जमलेल्या शेतकऱ्यांचे डोळे उघडण्याचे काम ते मोठ्या कुशलतेने करीत. ते अंकलखोपच्या म्हसोबाचे डोळयांच्या चोरीची कथा सांगत, गावातील मरीआईच्या गाडयाची झालेली कुचंबणा सांगत, कधी पंढरपुरच्या धटींगण बडव्यांच्या हातचालाखीची गंमत सांगत, तर कधी पिंडाला कावळा शिवतो तर कधी शिवत नाही या अंधश्रध्देवर नाना पाटील आपल्या जाहीर सभेत जोरदार टिका करीत. या सर्व टिकेचा उद्देश लोक जागृती हा होता. भिक्षुकशाही हा समाजाला लागलेला फार मोठा कलंक आहे तो दुर झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. भिक्षुकशाही आर्थिक, समाजिक, मानसिक पिळवणूक करते त्यातुन शेतकऱ्यांना मुक्त झाल्याशिवाय स्वराज्याचे सुराज्य निर्माण होणार नाही. असे नाना पाटील सतत आपल्या भाषणातून सांगत.

**गांधी लग्नाची चळवळ :**

ज्याप्रमाणे क्रांतिसिंह नाना पाटलांनी स्वत:च्या लग्नात भटजी न बोलवता स्वत: मंगलाष्टके म्हंटली तसेच आपल्या मुलांचेही स्वामींच्या हस्ते गांधी लग्न लावले. सातारा जिल्हयात नाना लोकप्रिय केलेली ही गांधी लग्न

चळवळ फार फोफावली. गांधी लग्नात वधुवरांना खादीचे पोशाख घालून व महात्मा गांधीच्या प्रतिमेला हार घालून विवाह साजरा केला जात असे. आणि आमच्या पोटी जन्माला येणारे बालक स्वातंत्र्याच्या कामाला येईल अशी प्रतिज्ञा घेतली जाई. ना मंडप, ना आरास , ना पंगत, ना वरात असे हे लग्न म्हणजे गरीब शेतकरी समाजाला वरदानच होते. लग्न हा मानवी जीवनातील मंगल क्षण असतो. पण या क्षणासाठी लक्षावधी गरीब शेतकरी कर्जबाजारी होऊन गुलामगिरीचे जीवन जगत होते. लग्नाच्या खर्चासाठी प्रत्येक गावात अनेक शेतकऱ्यांनी सावकाराकडे दहा दहा वर्षे जमीनी गहाण टाकल्या होत्या. गावेच्या गावे कर्जबाजारी होऊन सावकारी पाशात गेली होती. नाना पाटील यांनी हे सर्व जवळून पाहिले. आणि यावर एकच उपाय म्हणजे शेतकरी जागा करणे, शहाणा करणे, गांधी लग्नाचा त्यांना उपाय सांगून होणाऱ्या कर्जबाजारीपणापासून दुर ठेवणे. नानानी अशी शेकडो गांधी लग्ने लावली. यासाठी हजारो लोकांना निमंत्रित केले जायचे. पंगत , वरात नसणारे हे गांधी लग्न म्हणजे समाजासुधारणेचे प्रभावी माध्यम होते. या लग्नातून प्रेरणा घेवुन अनेकांनी आपल्या मुला-मुलींची गांधी लग्ने केली. जी.डी. ऊर्फ बापुसाहेब लाड, नाथाजी लाड, स्वातंत्र्यशाहीर शंकरराव निकम अशी कितीतरी क्रांतिकारकांची लग्ने गांधी लग्न पध्दतीने केलेली होती. नाना पाटील यांनी अश्या लग्नास यावे म्हणून लोक आग्रह करीत होते. 1948 साली नाना पाटील यांनी कुंडल येथे एक विधवा विवाहही घडवून आणला होता. अशारितीने नाना पाटलांचे सामाजिक कार्यातील योगदान खूप मोठे होते.

**क्रांतिसिंह नाना पाटील यांची शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी जागृती :**

1932 ते 1942 या कालखंडात सातारा जिल्हयातील जनतेत प्रचंड जागृती झाली होती. शेतकरी जीवनातून लढाऊ नेतृत्वाची शक्ती जन्माला आली. ती शक्ती एका प्रभावी व्यक्तीमत्वाच्या रुपाने निर्माण झाली. ते व्यक्तीमत्व म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील होते. नाना पाटील हे स्वत: शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांना चांगली जाण होती. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा हा शेतकरीच आहे हे नानांनी ओळखले होते. आपल्या भारत देशात बहुसंख्य लोक खेड्यात म्हणजेच ग्रामीण भागात राहातात आणि त्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर, व कामगार आणि श्रमिकाला जागृत केल्याशिवाय समाजमुक्त होणार नाही हे ओळखूनच नाना पाटील यांनी शेतकरी वर्गामध्ये त्यांच्या प्रश्नासंबंधी जागृती करण्यासा सुरुवात केली. ज्या ज्या वेळी नाना पाटील यांना संधी मिळेल त्या त्या वेळी त्यांनी शेतकऱ्यांना जागे करण्याचे काम केले. कांही वेळा ते स्वत:च डोक्यावर गॅसबत्ती घेऊन आज संध्याकाळी नाना पाटील यांचे भाषण होणार आहे तेव्हा शेतकऱ्यानी हजर रहावे असे त्यांनी सांगितले.

**निष्कर्ष :**

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न लोकांसमोर मांडले. त्यांना अंधश्रध्दा, अंधविश्वास, कर्जबाजारीपणा यापासून मुक्त होण्याचा संदेश दिला. त्यांच्या प्रचारामुळे साताऱ्यातील शेतकरी निर्भय झाला. त्यांनी दलित, शोषित, वंचित, शेतकरी, शेतमजूर, व कामगार यांच्या हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. ग्रामीण भागातच जनतेला शिक्षण स्वाभिमान व हक्काची जाणीव करुन देण्यात त्यांचे मोठे योगदान होते. क्रांतिसिंह नाना

पाटील यांच्या सामाजिक नेतृत्वामुळे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीला मोठे बळ मिळाले. छत्रपती शिवरायांच्या इतिहासाचे, प्रगतीचे व जनतानिष्ठ प्रकृतीचे मुलतत्व लक्षात घेऊन आणि इंग्रजी सत्ता भारतातून गेल्याशिवाय भारतीय शेतकरी सुखी होणार नाही. या जिद्दीने ते स्वातंत्र्य लढयात उतरले. त्यांचे विचार व कार्य आजही सामाजिक परिर्वतनासाठी प्रेरणादायी आहेत. त्यामुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांचे सामाजिक चळवळीतील नेतृत्व हे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात अत्यंत महत्वाचे दिशादर्शक ठरते.

**संदर्भ-सुची :**


1. द.क.पाटील, ``क्रांतिसिंह नाना पाटील आणि सातारा प्रतिसरकार,`` शिवाजी विदयापीठ प्रकाशन, कोल्हापूर 1978
2. भालचंद्र पाटील ``क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जीवनचरित्र``, सुयश प्रकाशन कोल्हापूर 2002.
3. राघव शिवणीकर, ``सातारचा सिंह-चरित्र``, श्रीराम बुक एजन्सी, पुणे 1988
4. डॉ. जयसिंगराव पवार, ``क्रांतिसिंह नाना पाटील``, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर 1984.
5. शंकर देशपांडे, ``क्रांतिसिंह नाना पाटील : जीवन आणि कार्य,`` फडके प्रकाशन कोल्हापूर 1987.
6. विश्वास पाटील, ``क्रांतिसुर्य``, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, 1982
7. मो.नी. ठोके ``श्रीमिकांचा कैवारी `` पारख प्रकाशन, बेळगाव 1983
8. रा.तु.पाटील``सांगली साताऱ्याचे राजकारण `` परखड प्रकाशन, तडसर 1986
9. रा.तु. पाटील ``क्रांतिसिंह नाना पाटील जीवित कार्य आणि तत्वज्ञान`` परखड प्रकाशन, तडसर 1986
10. व.न.इंगळे, ``पत्री सरकार``, सुविद्या प्रकाशन, सोलापूर डिसेंबर 2012.